# ...तेथे कर माझे जुळती!


गौतम पंगू

**(पूर्वप्रसिद्धी: इ-सकाळ, २३ नोव्हेंबर २०१२)**

कै. डॉ. आनंदीबाई जोशींची ओळख मराठी वाचकांना नव्यानं करून द्यायची गरज नाही. असंख्य सामाजिक, सांसारिक आणि शारिरिक अडचणींना सामोरं जात, तब्बल १२७ वर्षांपूर्वी अमेरिकेत येवून डॉक्टरकीचं शिक्षण पूर्ण करणाऱ्या या पहिल्या भारतीय स्त्री-डॉक्टरची कहाणी आपल्या चांगलीच परिचयाची आहे. त्यांच्या आयुष्यावर मराठीत बरंच लिखाण झालेलं आहे. त्यातलंच एक पुस्तक म्हणजे डॉ. अंजली कीर्तने यांनी लिहिलेलं त्यांचं अभ्यासपर चरित्र 'डॉ. आनंदीबाई जोशी: काळ आणि कर्तृत्व'. हे पुस्तक अलीकडे माझ्या वडिलांच्या वाचनात होतं. या पुस्तकातच असा उल्लेख आहे की आनंदीबाईंच्या मृत्यूनंतर त्यांचा रक्षाकलश अमेरिकेत पाठवला होता आणि पोकिप्सी नावाच्या एका गावातल्या दफनभूमीत तो पुरला होता. घरी वरचेवर या विषयावर चर्चा व्हायची. शेवटी एकदा 'गूगल मॅप्स' मध्ये बघितल्यावर कळलं की पोकिप्सी हे न्यूयॉर्क राज्यात न्यूयॉर्क सिटीच्या उत्तरेला सुमारे ८० मैलांवर हडसन नदीच्या काठी वसलेलं एक छोटं शहर आहे. आम्ही राहतो त्या फिलाडेल्फिया पासून ते फक्त तीनच तासांच्या अंतरावर आहे. मग आम्ही या दफनभूमीला भेट द्यायचा बेत केला. त्याप्रमाणं एका रात्री जावून पोकिप्सी मध्ये मुकाम ठोकला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी 'पोकिप्सी रुरल सेमेट्री' च्या ऑफिसमध्ये जावून धडकलो.

पुस्तकात दिलेल्या माहितीप्रमाणं ऑफिसमधल्या बाईला विचारलं, आम्हाला या सेमेट्रीमधल्या 'एमी लॉट' मधला ए-२१६ हा विभाग बघायचा आहे, तो कुठं आहे सांगाल का? 'एमी' हे आनंदीबाई अमेरिकेत ज्यांच्याकडं राहिल्या त्या थिओडोशिया कार्पेटरबाईंचं माहेरचं नाव. पण त्या ऑफिसमधल्या बाईंना मी काय विचारतोय ते कळेना. त्यांनी ओशाळवाणा चेहरा केला आणि 'सॉरी मी इथं नवीनच आहे' असं म्हणून तिथल्या एका सिनियर बाईला बोलावलं. या बाईंनी (यांचं नाव विकी फेल्स, डॉ. कीर्तनेंच्या पुस्तकातही त्यांचा उल्लेख आहे) माझ्याकडं बघताच 'आलं लक्षात!' असा चेहरा केला आणि मला विचारलं, 'तू त्या इंडियन डॉक्टरला बघायला आलायस ना?'. मी 'हो' म्हणताच त्यांनी पूर्ण सेमेट्रीचा नकाशा माझ्या हातात ठेवला आणि त्यात आनंदीबाईंची समाधी कुठं आहे त्याची खूण करून दिली. 'तिथं वर छोट्या टेकाडावर ती आहे. वर चढून जा, मग तुला ती भेटेल'. एखाद्या जिवंत व्यक्तीबद्दल बोलावं तसं त्या बोलत होत्या. त्यांचे आभार मानून मी निघालो तसं त्यांनी विचारलं, " इतके भारतीय तिला बघायला येतात, तिच्यापाशी जावून फुलं वाहून येतात, एवढं काय विशेष आहे तिच्यात? इथं अमेरिकन्स आपल्या सख्ख्या आईवडिलांची थडगी बघायलापण  कधी फिरकत नाहीत! ही बाई कोणी तुमची 'नॅशनल हिरो' आहे का?" मनात म्हटलं, ' हो, ती कुठल्याही 'नॅशनल हिरोपेक्षा कुठल्याच बाबतीत कमी नाही'. त्या बाईंना थोडक्यात आनंदीबाईंबद्दल माहिती दिली आणि तो नकाशा घेवून ऑफिसच्या बाहेर आलो.

त्या सेमेट्रीमध्ये प्रवेश केला. १६५ एकर क्षेत्रफळ असलेली ती मोठी सेमेट्री. एकंदर सेमेट्रीची आखणी, तिथल्या इमारतींचं आर्किटेक्चर फारच छान. सर्वत्र हिरवळ आणि दाट झाडी. मागून वाहणारी विशाल हडसन नदी. सप्टेंबरमधली ती सकाळ होती. हवेत बेताचा गारवा, पण छानसं उनही. एकूणच वातावरण प्रसन्न होतं. मृत्यूची भयाणता किंवा उदासीनता यांचा लवलेशही नव्हता. डॉ. कीर्तनेंच्या पुस्तकात उल्लेख होता की आनंदीबाई अमेरिकेत असताना त्यांनी म्हणे ब्रुकलीनमधली अशीच एक सेमेट्री पाहिली होती आणि मरणानंतर चिरविश्रांती घ्यायला ही किती छान जागा आहे, असं त्यांना वाटलं होतं. नकाशाप्रमाणं मार्ग शोधत 'ए' विभागात पोचलो. फेल्सबाईंनी सांगितल्याप्रमाणं टेकडीवर चढून गेलो. तिथं तर भरपूर दगड पसरले होते. त्या सगळ्यांमध्ये आनंदीबाईंच्या रक्षा जिथं पुरल्या तो दगड कोणता असेल? बरंच शोधलं. डॉ. कीर्तनेंचं पुस्तक बरोबर होतं. त्याच्या मुखपृष्ठावर या दगडाचा एक फोटो आहे. त्याच्या आधारे तो दगड कसा आहे, त्याच्या मागचा स्तंभ कसा दिसतो याचा अंदाज घेतला आणि पुन्हा शोधाशोध चालू केली. शेवटी तो दगड एकदाचा सापडला!




आम्ही त्या दगडाकडं काही क्षण निस्तब्ध होवून बघतच राहिलो. हळूच त्या दगडावरून हात फिरवला. त्यावर कोरलेल्या अक्षरांना हात लावला. किती महत्वाच्या ऐतिहासिक स्मृतीला आपण बघतो आहोत याची जाणीव झाली आणि मन एकदम शहारून गेलं! १२७ वर्षांपूर्वी डॉक्टर व्हायच्या ध्यासानं अमेरिकेला आलेली एक बुद्धिमान, जिद्दी, सुस्वभावी स्त्री त्या दगडाखाली चिरविश्रांती घेत होती. अवघ्या २२-२३ वर्षांचं आयुष्य, पण त्यात किती वादळं! दहाव्या वर्षी लग्न; बाराव्या वर्षी झालेलं आणि लगेचच मरण पावलेलं मूल; तेव्हापासून स्वतःच डॉक्टर बनायचा घेतलेला ध्यास; डॉक्टरकीच्या शिक्षणासाठी घेतलेला अमेरिकेला जायचा निर्णय; अमेरिकेतल्या कार्पेंटर कुटुंबाशी जडलेली पत्रमैत्री; समाजाचा तीव्र विरोध सहन करून, अनेक कल्पनातीत अडचणींना तोंड देत १९ व्या वर्षी अमेरिकेला बोटीतून एकटीनंच केलेलं प्रयाण; दोन महिन्यांच्या बोटीच्या प्रवासात झालेला त्रास, कार्पेंटर कुटुंबात राहताना उपभोगायला मिळालेलं हरवलेलं बालपण; पुढची ३ वर्षं फिलाडेल्फियामध्ये तब्येत खालावत असतानाही पूर्ण केलेला मेडिकलचा अभ्यास; भारताचा परतीचा प्रवास; या सगळ्यात साथ देणारा, काळाच्या पुढं पहायची क्षमता असलेला, पण विक्षिप्त, अहंकारी नवरा; आणि शेवटी अवघ्या २३ व्या वर्षी क्षयरोगानं झालेला मृत्यू...त्यांचा अवघा जीवनपटच डोळ्यांसमोरून सरकून गेला! आज काळ खूप बदललाय, स्त्रीशिक्षणाची स्थिती खूप सुधारली आहे, परदेशी शिकायला, नोकरीला जाणं खूप सोपं झालंय...पण सव्वाशे वर्षांपूर्वी आनंदीबाईंनी हे सगळं कसं केलं याचा विचार करून मन पुन्हा एकदा आदरानं आणि आश्चर्यानं नतमस्तक झालं! एवढ्याशा आयुष्यात पुढच्या कितीतरी पिढ्यांसाठी केवढा दिव्य वारसा सोडून गेल्या आनंदीबाई!

त्या दगडाला फुलं वाहून आदरांजली अर्पण केली. या दगडाच्या मागंच एक स्तंभ आहे. कार्पेंटर कुटुंबातल्या बऱ्याच लोकांची थडगी तिथंच आहेत. थिओडोशिया कार्पेंटरबाईंनी आनंदीबाईंना आपल्या कुटुंबात समाविष्ट करून घेतलं होतं, भरपूर मदत केली होती. आनंदीबाईंचा मृत्यू जरी भारतात झाला असला तरी त्यांची इच्छा होती की मरणानंतर त्यांची रक्षा अमेरिकेला पाठवण्यात यावी. ज्या देशात त्यांना त्यांची स्वप्नं साकार करता आली, स्वतंत्रपणे, निर्भरपणे जगता आलं, त्या देशात, त्यांच्या अमेरिकेतल्या परिवारासमवेत त्यांना चिरविश्रांती घ्यायची होती. कार्पेंटरबाईंनीही ती रक्षा एका ख्रिश्चनांच्या दफनभूमीमध्ये, आपल्या परिवाराच्या प्लॉटमध्ये पुरली आणि तिथं एक

छानसं स्मृतीचिन्ह उभं केलं. देश, भाषा, धर्म, संस्कृती, वय यासारख्या बंधनांना न जुमानता त्या दोघींमध्ये तेव्हा किती जवळीक निर्माण झाली होती याचंच हे प्रतीक आहे. कार्पेंटर परिवाराबद्दलही मन कृतज्ञतेनं भरून आलं.


BENJAMIN F CARPENTER
1842 —
EIGHMIE
1842 — 1920
1877. — 1878.

परतताना ऑफिसमध्ये जावून फेल्सबाईंचे पुन्हा आभार मानले. त्यांनी डॉ. कीर्तनेंच्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाची झेरॉक्स काढून घेतली. वडिलांनी त्यांना भारतीय पद्धतीनं 'नमस्ते' केलं. निरोप घेताना त्या म्हणाल्या, "तुम्ही निर्धास्त रहा! आम्ही आनंदीची चांगली काळजी घेतो आहोत!"

एखाद्या तीर्थक्षेत्राला भेट दिल्यासारखं समाधान मनात घेवून आम्ही तिथून परतलो.